दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. १३ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ५४ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## 'मकोका'चा बडगा आणि राजकारण्यांचे 'अंडरवर्ल्ड'

महाराष्ट्रात संघटित गुन्हेगारी आणि गँगवॉरचा कणा मोडण्यासाठी आणलेला 'मकोका' हा कडक कायदा आता गोवंश तस्करी आणि अवैध कत्तलखान्यांच्या टोळ्यांवरही लावण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. शासनाचे हे पाऊल वरवर पाहता केवळ पशू रक्षणासाठी....

---> अग्रलेख - पान 2 वर

## अल निनोचा मोठा परिणाम राज्यावर होईल, टास्क फोर्स तयार

**मुंबई :** अल निनोचा मोठा परिणाम आपल्या राज्यावर होईल. या संदर्भात आपण तयारी करत आहोत. आपण त्याचा टास्क फोर्स तयार केला. जलसंधारणाची कामे कशा प्रकारे मोठ्या प्रमाणात करता येतील, हाही आपला प्रयत्न आहे. कारण पाऊस कमी पडल्यानंतर मोठी धरणे कामी येत नाहीत. पाऊस कमी पडल्यानंतर जलसंधारणाची छोटे साठेच कामी येतात. त्यामुळे त्यावर खूप मोठ्या प्रमाणात आपण भर दिलेला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# शहरात पाच वर्षांत ४,०४३ महिला बेपत्ता; ३,६५७ महिलांचा शोध, ३८६ अद्यापही बेपत्ता

हिंदू प्रकाश वार्ता : नितीन दांडगे

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील बेपत्ता महिलांच्या प्रकरणांकडे पोलीस प्रशासनाने गांभीर्याने लक्ष केंद्रित केले असून महिलांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. 2021 ते 2025 या कालावधीत शहरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये एकूण 4,043 महिला बेपत्ता झाल्याची नोंद झाली आहे. त्यापैकी 3,657 महिलांचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले असून 386 महिला अद्याप बेपत्ता आहेत. या प्रकरणांचा तपास सुरू असून पोलीस महा




मित्रपरिवार यांची माहिती तपासली जात आहे. तांत्रिक तपासासह विविध जिल्हे आणि राज्यांतील पोलिसांशी समन्वय साधून महिलांचा शोध लागल्याने तपास सुरू आहे.

शहरातील वाढत्या लोकसंख्येसह सामाजिक बदलांच्या पार्श्वभूमीवर बेपत्ता व्यक्तींच्या

**सध्या 386 प्रलंबित प्रकरणाच्या तपासाला गती देण्यासाठी विशेष पोलीस महानिरीक्षक अश्वती डोरजे यांच्या मार्गदर्शनाखाली आधुनिक तंत्रज्ञान वापर करून विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. लवकरच प्रलंबित असलेल्या प्रकरणे पूर्ण होतील.**

**- जयश्री कुलकर्णी**
**सहाय्यक पोलीस निरीक्षक**

प्रकरणांमध्ये वाढ होत असल्याचे निरीक्षण व्यक्त केले जात आहे. त्यामुळे अशा तक्रारींवर तत्काळ कारवाई करण्यासाठी पोलिसांकडून विशेष लक्ष दिले जात आहे. महिला व मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रत्येक तक्रार गंभीरतेने घेतली जात असून तपासात कोणतीही हयगय केली जात नसल्याचे पोलीस अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, अद्याप बेपत्ता असलेल्या 386 महिलांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कार्यरत आहेत. जुन्या प्रकरणांचाही नव्याने आढावा घेतला जात असून आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने तपासाला गती देण्यात येत आहे. पोलीस आयुक्त स्वतः या प्रकरणांचा नियमित आढावा घेत असून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देत आहेत. बेपत्ता महिलांचा शोध हा केवळ पोलिसांसाठीच नव्हे तर समाजासाठीही महत्त्वाचा विषय असल्याने नागरिकांनीही संशयास्पद माहिती अथवा बेपत्ता महिलांबाबत कोणतीही माहिती असल्यास पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उर्वरित महिलांचा शोध लावण्यासाठी पोलीस प्रशासनाचे प्रयत्न सुरू असून येत्या काळात या प्रकरणांमध्ये अधिक प्रगती होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात वार्ता

### बिहारमध्ये कार-ट्रकच्या धडकेत 3 वरिष्ठ पोलीस अधिकारी, चालकाचा मृत्यू

**बिहार :** बिहारमधील बेगुसराय येथे कार आणि ट्रक यांच्यात झालेल्या भीषण अपघातात तीन वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि एका खासगी चालकाचा मृत्यू झाला. राष्ट्रीय महामार्ग NH-31 वर झालेल्या या दुर्घटनेमुळे पोलीस दलात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, साहेबपूर कमाल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बख्दा परिसरात हा अपघात घडला. पाटणा येथे एकदिवसीय प्रशिक्षण पूर्ण करून मधेपुरा जिल्ह्याकडे परतत असताना भरधाव वेगातील कार अनियंत्रित झाली आणि समोरून जाणाऱ्या ट्रकला जोरदार धडकली. या भीषण अपघातात रतवारा पोलीस ठाण्याचे प्रभारी साजन पासवान, बेल्लारी पोलीस ठाण्याचे प्रभारी नीरज कुमार, अरार पोलीस ठाण्याचे प्रभारी ज्ञानेंद्र अमरेंद्र आणि खासगी चालक ज्योतीश कुमार यांचा मृत्यू झाला. अपघात इतका गंभीर होता की ज्ञानेंद्र अमरेंद्र, नीरज कुमार आणि चालक ज्योतीश कुमार यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. गंभीर जखमी झालेल्या साजन पासवान यांना स्थानिकांच्या मदतीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

### राज्यातील सर्व 116 दुय्यम कारागृहे कायमस्वरूपी बंद

**मुंबई :** महसूल विभागाच्या नियंत्रणाखाली असलेली सर्वच्या सर्व ११६ दुय्यम कारागृहे कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. परिणामी, ब्रिटिश काळापासून चालत आलेली आणि स्वातंत्र्यानंतर सात दशकांहून अधिक काळ अस्तित्वात असलेली 'दुय्यम तुरुंग नियमपुस्तिका, १९५२' इतिहासजमा झाली आहे. राज्यातील दुय्यम कारागृहांची सद्यःस्थिती आणि त्यांच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी गृह विभागाने १७ ऑक्टोबर २०२३ रोजी एका विशेष अभ्यासगटाची स्थापना केली होती. या अभ्यासगटाने १० डिसेंबर २०२४ रोजी आपला अंतिम अहवाल सरकारला सादर केला. या अहवालावर अपर मुख्य सचिव (महसूल) आणि अपर मुख्य सचिव (गृह) यांच्यात ५ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीत सखोल चर्चा झाली. सध्या राज्यातील एकूण ११६ दुय्यम कारागृहांपैकी तब्बल ८० कारागृहे आधीच बंद अवस्थेत पडलेली आहेत. तर उर्वरित ३६ कारागृहे तांत्रिकदृष्ट्या कार्यरत असली, तरी ती सुस्थितीत नसल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर, गृह विभागाच्या अभिप्रायानंतर सरकारने ही सर्व दुय्यम कारागृहे कायमची बंद करण्याचा निर्णय घेतला. या दुय्यम कारागृहांमध्ये सद्यस्थितीत दाखल असलेल्या कैद्यांना संबंधित जिल्ह्यातील जिल्हा कारागृह किंवा मध्यवर्ती कारागृहांमध्ये तातडीने रवानगी करण्याची जबाबदारी गृह (कारागृह) विभागाला देण्यात आली आहे.

### राज्यातील 13 हजार कृषी कर्मचाऱ्यांना मिळणार अत्याधुनिक लॅपटॉप

**मुंबई :** कृषी क्षेत्रासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (एआय) धोरण स्वीकारणारे देशातील पहिले राज्य आहे. त्यामुळे आता कृषी योजनांची अंमलबजावणी अधिक वेगवान करण्यासाठी राज्य सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. कृषी विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेला आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज करण्यासाठी राज्यातील १३ हजार २७५ क्षेत्रीय कृषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक लॅपटॉप उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना लॅपटॉप पुरवण्यासाठी राज्य सरकारने १०९ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. या लॅपटॉपचा पुरवठा जुलै २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन असून, ऑगस्ट २०२६ च्या पहिल्या आठवड्यात सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांपर्यंत ते पोहोचवले जातील. पुरवठादाराकडून प्राप्त होणाऱ्या प्रत्येक लॅपटॉपची पारदर्शकता आणि दर्जा राखण्यासाठी १०० टक्के गुणवत्ता तपासणी केली जाणार आहे. ही तपासणी 'सीओईपी' तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे या स्वतंत्र त्रयस्थ संस्थेमार्फत केली जाईल, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

## "खरं की काय"




# गुटखा व्यवसाय करणाऱ्यांवर आता होणार मकोका

## अन्न व औषध प्रशासन मार्फत अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल - मंत्री नरहरी झिरवाळ

**मुंबई:** "गुटखा व्यवसाय करणाऱ्यांवर मकोका लागू करता येईल अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरचे हिवाळी अधिवेशनात विधानसभेत दिली होती. त्यानुसार गुटखा उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्री करणाऱ्या संघटित साखळी कठोर कारवाई करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल टाकत आहे,"असे प्रतिपादन अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले आहे.गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला तसेच तत्सम तंबाखू-मिश्रित प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्री करणाऱ्या संघटित नेटवर्क्सविरुद्ध पात्र प्रकरणांत महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ म्हणजेच मकोका लागू करण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आज १२ जून २०२६ रोजी स्पष्ट आदेश दिले.यानुसार अन्न व औषध प्रशासन, पोलीस आणि संबंधित यंत्रणांच्या कारवायांमधून असे दिसून आले आहे की, काही प्रकरणांमध्ये केवळ किरकोळ विक्रेतेच नव्हे, तर उत्पादक, पुरवठादार, वित्तपुरवठादार, वाहतूकदार, गोदाम चालक, घाऊक विक्रेते, उप-विक्रेते आणि इतर सहाय्यक घटक यांचा समन्वयित सहभाग असतो. अनेक वेळा बनावट कागदपत्रे, बनावट चलने, डमी कंपन्या, बेनामी व्यवहार, गुप्त गोदामे, आंतरराज्य पुरवठा साखळी, तसेच वाहतूक व वितरणासाठी विविध मार्गांचा वापर केला जातो. त्यामुळे अशा कारवाया केवळ अन्नसुरक्षा उल्लंघनापुरत्या मर्यादित न ठेवता, पात्र प्रकरणांत संघटित गुन्हेगारीच्या कारवाई केली जाणार आहे.

अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत असुरक्षित अन्नाचे उत्पादन, साठवणूक, वितरण किंवा विक्री करणे हा गंभीर गुन्हा आहे. सदर अधिनियमाच्या कलम ५९ अंतर्गत अशा गुन्ह्यांसाठी कारावासाची तरतूद आहे. कलम ६४ अंतर्गत पुनरावृत्ती झाल्यास वाढीव शिक्षेची तरतूद आहे. तसेच कलमे ३८ व ४१ नुसार अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना तपासणी, शोध व जप्तीचे अधिकार देण्यात आले आहेत. कलम ४२ अंतर्गत अभियोजन सुरू करण्याची प्रक्रिया करण्यात

## राज्यसभा निवडणुकीत 24 उमेदवार बिनविरोध

**नवी दिल्ली :** देशातल्या १० राज्यांतील २४ नेत्यांची राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली आहे. राज्यसभेच्या एकूण २७ जागांपैकी तब्बल २४ जागांचा निकाल स्पष्ट झाला असून, यामध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीने १९ जागांवर, तर काँग्रेसने ५ जागांवर बिनविरोध विजय मिळवला आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस तरुण चुघ यांची बिनविरोध निवड झाली आहे. आता केवळ झारखंडमधील दोन आणि मिझोरममधील एका जागेसाठी आगामी १८ जून रोजी मतदान होणार आहे.

राज्यसभेतील २४ जागांच्या निकालामुळे २४५ सदस्य संख्या असलेल्या सभागृहात 'एनडीए'चे संख्याबळ आता १४९ जागांवर पोहोचण्याचा अंदाज आहे. यामुळे वरिष्ठ सभागृहात सत्ताधारी आघाडीची स्थिती कमालीची मजबूत झाली आहे.

मध्यप्रदेशमध्ये काँग्रेस उमेदवार मीनाक्षी नटराजन यांचा उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी बाद केल्यामुळे, भाजपचे तीनही उमेदवार बिनविरोध निवडून आले. निवडणूक आयोगाने भाजपचे रजनीश अग्रवाल, तरुण चुघ आणि महेश केवट यांना बिनविरोध निर्वाचित घोषित करत प्रमाणपत्रे सुपूर्द केली आहेत.

## मे महिन्यात किरकोळ महागाई दर 3.93 टक्क्यांवर

**नवी दिल्ली :** देशात किरकोळ महागाईचा वेग पुन्हा एकदा वाढला आहे. मे महिन्यात अन्नपदार्थांच्या किमतींमध्ये वाढ झाल्यामुळे ग्राहक किंमत निर्देशांकावर (सीपीआय) आधारित किरकोळ महागाई दर ३.९३ टक्क्यांवर पोहोचला आहे. यापूर्वी एप्रिल महिन्यात हा दर ३.४८ टक्के होता. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने शुक्रवारी सांगितले की, सीपीआयवर आधारित किरकोळ महागाई दरात झालेली ही वाढ प्रामुख्याने अन्नधान्यांच्या किमती आणि भाज्या, विशेषतः टोमॅटो यांच्या वाढत्या किमतींमुळे झाली आहे. मागील पाच महिन्यांत पहिल्यांदाच खुदरा महागाई भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मध्यमकालीन चार टक्के उद्दिष्टाच्या अत्यंत जवळ पोहोचली आहे.

## बातमीचा दणका : गंगापूर तहसील कार्यालय प्रशासनाने वाळू वाटपाचा घेतला निर्णय

हिंदू प्रकाश वार्ता : प्रतिनिधी

**गंगापूर प्रतिनिधी :** शासनाच्या नियमाप्रमाणे ठरवून दिलेली वाळू मिळवून देण्यासाठी गंगापूर तहसील कार्यालयात संबंधित कर्मचाऱ्यासह तहसीलदारांना अनेक लाभार्थ्यासह कार्यालयात भेटून आक्रमक भूमिका घेऊन कर्मचाऱ्याला तात्काळ निलंबित करा अशी मागणी गंगापूर पंचायत समिती चे सभापती कविता चव्हाण यांची पती




भारतीय जनता पार्टीचे गंगापूर तालुका अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी तहसीलदारांकडे केली गंगापूर पंचायत समिती मार्फत मंजूर झालेल्या घरकुलाची यादी महसूल प्रशासनाकडे देऊन हेतू पुरस्कार टोलवाटोलवी करून गोरगरीब जनतेला मिळणारी वाळू न मिळाल्यामुळे तहसील महसूल विभागाचा बोगस कारभार लाभार्थ्यांना सोबत घेऊन अखेर जनतेसमोर आणला

गंगापूर भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष तथा गंगापूर पंचायत समितीच्या कविताताई चव्हाण यांच्या पत्नीचा रुद्र अवतार पाहून तहसील प्रशासनाची धावपळ उडाली व; गंगापूर तहसील कार्यालय पुन्हा चर्चेत

गंगापूर येथील तहसील कार्यालयात पुन्हा एकदा मोठा गदारोळ झाल्याचे समोर आले आहे. पंचायत समितीच्या सभापतींच्या पतीने थेट तहसील कार्यालयात जाऊन अधिकार्यांना धारेवर धरल्याचा एक व्हिडिओ सध्या समाजमाध्यमांवर जोरदार व्हायरल होत आहे. घरकुल लाभार्थ्यांच्या हक्काच्या वाळूच्या मुद्द्यावरून हा सर्व प्रकार घडल्याचे सांगण्यात येत असून, यामुळे प्रशासकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना वाळू मिळण्यासाठी गेल्या

-> पान 2 वर

## बातमीचा दणका : गुलमंडीतील नाल्याचा गाळ अखेर हटवला; व्यापारी, रिक्षाचालक नागरिकांकडून समाधान

### बातमी प्रसिद्ध होताच मनपा प्रशासनाची धावपळ सुरु



नाला स्वच्छ झाला; पण गुलमंडी दुर्गंधीच्या विळख्यात

नाल्याचा गाळ रस्त्यावरच; रिक्षाचालक, व्यापारी आणि नागरिकांचा संताप

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी
सिद्धेश्वर थोर

छत्रपती संभाजीनगर : शहरातील व्यापारीदृष्ट्या महत्त्वाच्या आणि नेहमीच वर्दळीच्या गुलमंडी परिसरात नाल्याची साफसफाई केल्यानंतर काढलेला गाळ आणि कचरा रस्त्याच्या कडेला टाकून ठेवण्यात आल्याने परिसर दुर्गंधीच्या विळख्यात सापडला आहे. या दुर्गंधीमुळे रिक्षाचालक, दुकानदार, ग्राहक आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून

-> पान 2 वर

"साफसफाई केली, पण गाळ उचलायचा विसरले का?"

नाल्याची साफसफाई करणे योग्यच आहे. मात्र काढलेला गाळ रस्त्यावरच टाकून ठेवल्याने दुर्गंधी पसरली आहे. रिक्षा स्टॅन्डवर येणाऱ्या प्रवाशांनाही त्रास होत आहे. साफसफाईनंतर लगेचच गाळ उचलला गेला पाहिजे होता.

- स्थानिक रिक्षाचालक

"ग्राहकांसमोर दुर्गंधी आणि ... चित्र"

न्यूज़ इम्पैक्ट



हिंदू प्रकाश वार्ता : सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** गुलमंडी परिसरातील नाल्याच्या साफसफाईनंतर काढलेला गाळ आणि कचरा रस्त्याच्या कडेला टाकून ठेवल्याने परिसरात दुर्गंधी पसरल्याची बातमी हिंदू प्रकाशवार्ता मध्ये प्रसिद्ध होताच महापालिका प्रशासनाने तातडीने दखल घेत संबंधित ठिकाणी कर्मचाऱ्यांना पाठवून नाल्यातून काढलेला गाळ आणि कचरा उचलून परिसर स्वच्छ केला.

गुलमंडी हा शहरातील प्रमुख व्यापारी आणि वर्दळीचा परिसर आहे. नाल्याची साफसफाई झाल्यानंतर काढलेला गाळ रस्त्यालगतच पडून असल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली होती. यामुळे रिक्षाचालक, दुकानदार, ग्राहक आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे वृत्त हिंदू प्रकाशवार्ता ने प्रकाशित केले होते.

या वृत्ताची दखल घेत महापालिका प्रशासनाने तत्काळ हालचाली सुरू केल्या. मनपाच्या कर्मचाऱ्यांनी संबंधित ठिकाणी जाऊन रस्त्याच्या कडेला पडून असलेला गाळ आणि कचरा उचलला तसेच परिसराची स्वच्छता केली. त्यामुळे काही दिवसांपासून नागरिकांना भेडसावत असलेल्या दुर्गंधीच्या समस्येत मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

गुलमंडी परिसरात मोठ्या प्रमाणावर व्यापारी आस्थापना, खाद्यपदार्थ विक्री केंद्रे आणि रिक्षा स्टॅन्ड असल्याने या दुर्गंधीचा परिणाम दैनंदिन व्यवहारांवर होत होता. गाळ हटविल्यानंतर परिसरातील वातावरण पूर्ववत झाल्याने व्यापारी आणि रिक्षाचालकांनी समाधान व्यक्त केले आहे.

स्थानिक नागरिकांनीही प्रशासनाच्या तातडीच्या कार्यवाहीचे स्वागत केले असून भविष्यात नाल्यांची साफसफाई केल्यानंतर काढलेला गाळ त्वरित उचलण्याची व्यवस्था कायमस्वरूपी करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तसेच नागरिकांच्या समस्या प्रकाशझोतात आणून त्यावर कार्यवाही घडवून आणण्यात स्थानिक माध्यमांची भूमिका महत्त्वाची असल्याचेही अनेकांनी नमूद केले.

गुलमंडी परिसरातील ही समस्या मार्गी लागल्याने व्यापारी, रिक्षाचालक आणि नागरिकांनी दैनिक हिंदू प्रकाशवार्ता वृत्तपत्राचे तसेच महापालिका प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहेत.



# संपादकीय

## 'मकोका'चा बडगा आणि राजकारण्यांचे 'अंडरवर्ल्ड'

महाराष्ट्रात संघटित गुन्हेगारी आणि गँगवॉरचा कणा मोडण्यासाठी आणलेला 'मकोका' हा कडक कायदा आता गोवंश तस्करी आणि अवैध कत्तलखान्यांच्या टोळ्यांवरही लावण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. शासनाचे हे पाऊल वरवर पाहता केवळ पशू रक्षणासाठी वाटत असले, तरी या कायद्याच्या मूळ व्याख्येचा विचार केला, तर राज्यातील अनेक बड्या धेंडांचे धाबे दणाणले पाहिजेत. मकोका हा केवळ रस्त्यावरील गुंडांसाठी नसून, 'दोन किंवा अधिक लोकांनी आर्थिक फायद्यासाठी केलेली संघटित गुन्हेगारी' असा याचा मूळ अर्थ आहे. जर हाच निकष लावायचा झाला, तर आज पांढरपेशा वेशात फिरणाऱ्या अनेक राजकीय नेत्यांचे छुपे साम्राज्य थेट या कायद्याच्या कक्षेत येऊ शकते. राजकारणाच्या आडोश्याने चालणारे कत्तलखाने आणि गुटखा कंपन्यांचे जाळे पाहिले, तर हा कायदा नेमका कुठे आणि कोणावर लावायला हवा, याचे उत्तर उघड आहे. राज्यातील अवैध कत्तलखान्यांचा इतिहास तपासला, तर हे केवळ काही कसाई किंवा स्थानिक व्यापाऱ्यांचे काम नाही, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. हजारो जनावरांची बेकायदेशीर वाहतूक करणे, आंतरराज्य सीमा पार करणे आणि पोलिसांच्या डोळ्यांदेखत हे कत्तलखाने चालवणे, हे एका मोठ्या राजकीय वरदहस्ताशिवाय अशक्य आहे. अनेक बड्या नेत्यांची किंवा त्यांच्या नातेवाईकांची या कत्तलखान्यांमध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष भागीदारी असल्याचे उघड गुपित आहे. हा सत्तेच्या पैशावर चालणारा एक प्रचंड मोठा संघटित उद्योग आहे. जर शासन खरोखरच प्रामाणिक असेल, तर केवळ ट्रक चालकांवर किंवा दलालांवर गुन्हे दाखल करून भागणार नाही. या व्यवसायाच्या मूळ सूत्रधारांपर्यंत, म्हणजेच एसी केबिनमध्ये बसून या रक्ताच्या व्यापारावर स्वतःची राजकीय पोळी भाजणाऱ्या बड्या नेत्यांपर्यंत 'मकोका'चा हात पोहोचायला हवा. कत्तलखान्यांपेक्षाही भयानक आणि छुप्या पद्धतीने चालणारे दुसरे साम्राज्य म्हणजे 'गुटखा कंपन्या आणि माफिया'. महाराष्ट्रात गुटखा बंदी असूनही प्रत्येक गल्लीबोळातील टपरीवर गुटखा अगदी सहज उपलब्ध होतो, हा चमत्कार कसा घडतो? याचे कारण यामागे कोट्यवधी रुपयांची उलाढाल करणारी एक समांतर यंत्रणा कार्यरत आहे. शेजारील राज्यांमधून छुप्या मार्गाने गुटखा आणणे, त्याचे वितरण करणे आणि या संपूर्ण काळ्या बाजाराचे संरक्षण करणे, यामागे काही राजकारण्यांची मोठी ताकद उभी आहे. अनेक गुटखा कंपन्यांचे थेट मालक किंवा त्यांचे मुख्य भागीदार हे पडद्यामागचे राजकीय नेतेच आहेत. तरुण पिढीला सुपाऱ्या आणि तंबाखूच्या विळख्यात ढकलून स्वतःचे राजकीय आणि आर्थिक महाल उभे करणाऱ्या या पांढरपेशा गुन्हेगारांवर खरा 'मकोका' लावण्याची गरज आहे. दुर्दैवाने, आपल्याकडे कायदे हे बऱ्याचदा केवळ राजकीय सोयीसाठी किंवा छोट्या गुन्हेगारांना वठणीवर आणण्यासाठी वापरले जातात. 'मकोका' सारख्या अस्त्रामुळे जर खरोखरच गुन्हेगारी नष्ट करायची असेल, तर कायद्याची नजर निष्पक्ष असावी लागेल. मग तो अवैध कत्तलखाना चालवणारा असो की तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त करणारी गुटखा कंपनी चालवणारा; जर त्यांच्यामागे संघटित टोळी आणि राजकीय सत्तेचा गैरवापर असेल, तर त्यांच्यावर हा कायदा लावण्याचे धाडस प्रशासनाने दाखवले पाहिजे. जेव्हा सत्तेच्या उजेडात बसलेले हे खरे सूत्रधार या कायद्याच्या कचाट्यात येतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने कायद्याचा धाक निर्माण होईल. अन्यथा, कायदे बदलतील, नियम कडक होतील, पण राजकारण्यांच्या आश्रयाने चालणारे हे काळे साम्राज्य असेच फोफावत राहील.

### शासकीय रेशनच्या धान्य, तांदळाचा काळाबाजार

## श्रेया ट्रेडिंग कंपनीवर छापा

### पन्नास हजार सातशे रुपयांचा मुद्देमाल जप्त

**हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी**

**परभणी :** एकीकडे राशन दुकानदार एक किलो धान्य जास्त देत नाही उलट त्यांचं पाच ते सहा किलो राशन कमी करून देतो आणि एवढाच मालवरून आला असल्याचे सांगत असतो चोरी केलेला माल हा काळा बाजारात विकल्या जातो असाच एक प्रकार हद्दीत करून काळा बाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने ठेवलेल्या मालावर कारवाई करत तांदळाचा. मोठा साठा जप्त केला आहे . 49 तांदूळ पंचवीस क्विंटल 35 किलो 50 हजार 700 रुपये किमतीचा मुद्देमाल. पोलिसांनी ताब्यात घेण्यात आला मिळालेल्या अधिक माहितीनुसार नवा मोंढा येथील व्यापारी अमोल रमेश राठी वय 28 वर्ष राहणार प्रसावतनगर त्यांच्या श्रेया ट्रेडिंग कंपनी शासकीय राष्ट्रांचा अवैधरीत्या साठवून ठेवला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती या माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकून तपासणी केली असता दुकानांमध्ये 49 कट्टे.तांदूळ सापडला. सदरील तांदूळ काळ्या बाजारात विक्री करण्याचा उद्देशाने साठवून ठेवण्यात आल्याचा संशय पोलिसांना आला असून पुढील कायदेशीर कारवाई साठी जप्त करण्यात आलेला मोजमाल कोतवाली पोलीस ठाण्यात जमा करण्यात आला आहे सदरील ची कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस निरीक्षक गजेंद्र सरदे यांच्या मार्गदर्शकांनी करण्यात आली कारवाई पोलीस उपनिरीक्षक परिहार पोलीस हवालदार रंजीत आगळे रवी जाधव सूर्यकांत फड बुकरे काळे पोलीस कॉन्स्टेबल निलेश परसोडे दीपक मंदिराज यांनी सहभाग घेतला जिल्ह्यात शासकीय धान्याचा काळाबाजार पोलीस व पुरवठा विभागाकडून सातत्याने विशेष मोहीम राबविण्यात येत असून अशा प्रकारच्या गैरव्यवहारावर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे या कारवाईमध्ये राशन धान्याचा अवैधसाठे बाजी व काळाबाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून पोलीस ठाण्याच्या बाजूलाच अवैध काळा बाजारात विकले जाणारा माल सापडल्यामुळे चर्चा ला उधाण आले.

## बातमीचा दणका : गंगापूर तहसील कार्यालय प्रशासनाने वाळू वाटपाचा घेतला निर्णय

पान 1 वरून ->

अनेक महिन्यांपासून पाठपुरावा सुरू होता. गंगापूर पंचायत समिती मार्फत मंजूर लाभार्थ्यांची यादी तहसील प्रशासनाकडे सादर करूनही त्यावर कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. ऑनलाइन संकेतस्थळ बंद झाल्याचे कारण पुढे केल्याने संतप्त झालेल्या भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष रवी चव्हाण यांनी थेट तहसीलदारांच्या दालनात प्रवेश केला आणि अधिकाऱ्यांना जाब विचारण्यास सुरुवात केली.

सदर व्हिडिओमध्ये, प्रशासकीय कामात बाहेरील व्यक्तींचा हस्तक्षेप होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. कार्यालयातील संगणक ऑपरेटर आणि इतर खासगी व्यक्ती शासकीय कामात का लुडबुड करत आहेत, असा सवाल उपस्थित करत संबंधित कर्मचाऱ्याला तात्काळ निलंबित करण्याची मागणी तिथे करण्यात आली. सर्वसामान्य नागरिकांची कामे रखडलेली असताना वाळू माफियांचे कामे मात्र विनाअडथळा सुरू असल्याचा संताप यावेळी व्यक्त करण्यात आला. गेल्या अनेक दिवसांपासून सतत संपर्कात असूनही नागरिकांच्या पदरी निराशाच पडत असल्याने, आता लोकप्रतिनिधी आणि भाजपा तालुका अध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि नागरिक स्वतः मिळून ठरवून दिलेल्या ठिकाणांवरून घरकुल लाभार्थ्यांना वाळूचे वाटप करतील, असा पवित्रा तिथे घेण्यात आला. महसूल विभागाच्या संथ कारभारामुळे लाभार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगत, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. या वादामुळे गंगापूर तहसील कार्यालयातील अंतर्गत कारभार आणि अधिकाऱ्यांमधील समन्वय पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला.

# अभिजीत दिपकेसारखे आंबेडकरवादी नेतृत्व पुढे येत असेल तर त्याचे स्वागत व्हायला हवे

आजचा काळ वेगाने बदलत आहे. तंत्रज्ञान बदलत आहे, समाज बदलत आहे, राजकारण बदलत आहे आणि या सर्व बदलांच्या केंद्रस्थानी उभी आहे ती आजची तरुणाई. ही तरुणाई केवळ मोबाईल, सोशल मीडिया किंवा आधुनिक जीवनशैलीपुरती मर्यादित नाही; तर ती विचार करणारी, प्रश्न विचारणारी, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारी आणि परिवर्तनाची स्वप्ने पाहणारी पिढी आहे. परंतु दुर्दैवाने अनेकदा या तरुणांच्या मनातील भावना समजून घेण्याऐवजी त्यांच्यावर टीका केली जाते, त्यांना चुकीचे ठरवले जाते किंवा त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जाते. अशा वेळी एक प्रश्न निर्माण होतो आपण खरंच तरुणांच्या मनातील वादळ समजून घेण्याचा प्रयत्न करतो आहोत का?

समाजाच्या परिवर्तनाचा इतिहास पाहिला तर एक गोष्ट स्पष्टपणे दिसून येते की, प्रत्येक मोठ्या सामाजिक बदलामागे जागृत तरुणाई आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व उभे असते. जेव्हा समाजातील अन्याय, विषमता, शोषण आणि असमानतेविरुद्ध आवाज उठवणारे नेतृत्व पुढे येते, तेव्हा त्या नेतृत्वाकडे केवळ एका व्यक्तीच्या रूपात न पाहता एका विचाराच्या प्रतिनिधी म्हणून पाहिले जाते. आज मराठवाड्यासह महाराष्ट्रात अभिजीत दीपके यांच्यासारखे आंबेडकरवादी विचारांचे नेतृत्व पुढे येत असल्याची चर्चा होत आहे. अशा नेतृत्वाचे स्वागत करणे ही लोकशाहीवादी आणि परिवर्तनवादी समाजाची जबाबदारी आहे.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि मानवी स्वाभिमानासाठी संघर्ष केला. त्यांनी वंचित, शोषित आणि दुर्लक्षित समाजघटकांना केवळ हक्कांची जाणीव करून दिली नाही, तर त्या हक्कांसाठी संघटितपणे लढण्याची प्रेरणाही दिली. त्यांच्या विचारांचा प्रभाव आजही लाखो तरुणांच्या मनावर आहे. त्यामुळे जेव्हा एखादा तरुण नेता आंबेडकरवादी मूल्ये घेऊन समाजासमोर येतो, तेव्हा त्याकडे आशेच्या नजरेने पाहिले जाते.आजची तरुणाई अनेक आव्हानांशी सामना करत आहे. शिक्षण पूर्ण करूनही रोजगाराची हमी नाही. वाढती महागाई, आर्थिक अस्थिरता, स्पर्धेचा प्रचंड ताण, सामाजिक असमानता आणि भविष्याबद्दलची अनिश्चितता यामुळे युवकांच्या मनात अस्वस्थता निर्माण झाली आहे. अनेक तरुणांना असे वाटते की त्यांच्या प्रश्नांना पुरेसे महत्त्व दिले जात नाही. त्यांच्या अपेक्षा आणि संघर्ष समजून घेण्याऐवजी त्यांच्यावर टीका केली जाते. अशा परिस्थितीत जर एखादी चळवळ किंवा नेतृत्व त्यांच्या भावना मांडण्यासाठी संविधानिक मूल्यानुसार विचारपीठ उपलब्ध करून देत असेल, तर त्या चळवळीचा अभ्यास आणि संवाद आवश्यक ठरतो.आज "कॉक्रोज जनता पार्टी" या नावाने सोशल मीडियावर सुरू झालेल्या चळवळीची चर्चा राज्यभर होत आहे. या चळवळीत अनेक युवक सहभागी होत आहेत. कोणतीही चळवळ अचानक उभी राहत नाही. तिच्यामागे समाजातील काही प्रश्न, काही वेदना आणि काही अपेक्षा असतात. त्यामुळे या चळवळीला किंवा तिच्या नेतृत्वाला विरोध करण्यापूर्वी त्या मागील वास्तव समजून घेणे गरजेचे आहे. आजचा तरुण रस्त्यावर का उतरतो? तो संघटित का होतो? तो नव्या नेतृत्वाच्या मागे का उभा राहतो? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची आवश्यकता आहे.



एखादा तरुण जेव्हा सामाजिक किंवा राजकीय चळवळीत सहभागी होतो, तेव्हा त्यामागे केवळ उत्साह नसतो; तर त्याच्या मनातील अनुभव, संघर्ष आणि अपेक्षा दडलेल्या असतात. अनेकांना वाटते की तरुण आंदोलन करतात, प्रश्न विचारतात किंवा नवीन नेतृत्वामागे उभे राहतात म्हणजे ते चुकीच्या मार्गावर आहेत. परंतु प्रत्येक वेळी असे नसते. अनेकदा ही कृती त्यांच्या मनातील असंतोष, अन्यायाविरुद्धचा आक्रोश आणि बदलाची इच्छा व्यक्त करण्याचा मार्ग असतो.

लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रत्येक नागरिकाला विचार मांडण्याचा, संघटित होण्याचा आणि सामाजिक,राजकीय चळवळी उभारण्याचा अधिकार आहे. हा अधिकार भारतीय संविधानाने दिलेला आहे. त्यामुळे कोणत्याही चळवळीचे मूल्यमापन तिच्या विचारांच्या आणि कार्याच्या आधारे झाले पाहिजे. केवळ पूर्वग्रह, अफवा किंवा राजकीय मतभेदांच्या आधारावर एखाद्या चळवळीचा विरोध करणे लोकशाहीच्या मूल्यांना धरून नाही.

आज समाजात अनेक नव्या चळवळी आणि नेतृत्व उदयास येत आहेत. या चळवळींना विरोध करणारेही आहेत आणि समर्थन करणारेही आहेत. परंतु कोणत्याही चळवळीचा किंवा नेतृत्वाचा विरोध करण्यापूर्वी त्या मागील भावना समजून घेणे आवश्यक आहे. कारण कोणतीही चळवळ शून्यातून जन्माला येत नाही. तिच्या मागे समाजातील एखादा प्रश्न, एखादी वेदना किंवा एखादी अपेक्षा असते. त्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून केवळ चळवळीवर टीका करणे हा समस्येचा उपाय ठरत नाही.

समाजातील विविध विचारप्रवाहांनी एकमेकांचे म्हणणे ऐकले पाहिजे. मतभेद असू शकतात, पण मनभेद होऊ नयेत. लोकशाहीत विचारांची लढाई असते, व्यक्तींची नाही. त्यामुळे नव्या नेतृत्वाकडे संशयाने नव्हे तर चिकित्सक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. जेथे चांगले कार्य दिसेल तेथे त्याचे कौतुक करावे आणि जेथे त्रुटी असतील तेथे विधायक टीका करावी. हाच लोकशाहीचा मार्ग आहे.विशेषतः आंबेडकरवादी चळवळींचे महत्त्व आज अधिक वाढले आहे. कारण संविधानिक मूल्यांवर आधारित समाज निर्माण करण्यासाठी सामाजिक जागृती आवश्यक आहे. जात, धर्म, भाषा, प्रदेश यांपलीकडे जाऊन सर्वांना समान संधी मिळावी, प्रत्येक व्यक्तीचा सन्मान राखला जावा आणि सामाजिक न्यायाची अंमलबजावणी व्हावी, ही बाबासाहेबांची भूमिका होती. या मूल्यांसाठी कार्य करणाऱ्या प्रत्येक नेतृत्वाला समाजाने सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे.

आज अनेक तरुण सोशल मीडियावर आपली मते व्यक्त करत आहेत. ते प्रश्न विचारत आहेत. ते बदलाची मागणी करत आहेत. ही बाब लोकशाहीसाठी चांगली आहे. कारण जागृत तरुणाई ही राष्ट्राच्या प्रगतीची सर्वात मोठी ताकद असते. ज्या देशातील तरुण विचार करतात, प्रश्न विचारतात आणि समाजासाठी काम करतात, तो देश कधीच मागे राहत नाही. त्यामुळे तरुणांच्या भावना समजून घेणे ही समाजातील ज्येष्ठ, बुद्धिजीवी आणि राजकीय नेतृत्वाची जबाबदारी आहे.प्रत्येक तरुण हा देशाचा आधारस्तंभ आहे. त्याच्या डोळ्यांत स्वप्ने आहेत, मनात ऊर्जा आहे आणि समाज बदलण्याची क्षमता आहे. जर या ऊर्जेला योग्य दिशा मिळाली तर ती राष्ट्रनिर्मितीसाठी उपयोगी पडते. पण जर तिच्याकडे दुर्लक्ष झाले, तर ती असंतोषात रूपांतरित होऊ शकते. म्हणूनच आजच्या तरुणांच्या भावना आणि अपेक्षा समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार दिला. त्यांनी लोकशाही म्हणजे केवळ मतदान नव्हे, तर संवाद, सहभाग आणि विचारांचे स्वातंत्र्य असल्याचे सांगितले. म्हणूनच लोकशाही समाजात मतभेद असणे स्वाभाविक आहे. परंतु मतभेदांचे रूपांतर मनभेदात होऊ नये. संवादाची जागा संघर्षाने घेतली, तर समाजात दुरावा वाढतो. उलट संवाद झाला, तर अनेक गैरसमज दूर होतात आणि सामंजस्य निर्माण होते.

आज गरज आहे ती तरुणांना ऐकून घेण्याची. त्यांच्या प्रश्नांना गांभीर्याने घेण्याची. कारण प्रत्येक तरुणाच्या मनात एक स्वप्न असते स्वतःच्या कुटुंबासाठी काहीतरी करण्याचे, समाजासाठी योगदान देण्याचे आणि देशाच्या विकासात सहभागी होण्याचे. पण जेव्हा त्याला संधी मिळत नाही, त्याच्या प्रश्नांना उत्तरे मिळत नाहीत किंवा त्याच्या भावना दुर्लक्षित केल्या जातात, तेव्हा त्याच्या मनात अस्वस्थता निर्माण होते. ही अस्वस्थता समजून घेणे समाजाची जबाबदारी आहे.

अभिजीत दीपके यांच्यासारखे नेतृत्व पुढे येत असेल, तर त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे, त्यांच्या विचारांचे परीक्षण केले पाहिजे आणि समाजहिताच्या कार्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. विरोधासाठी विरोध करण्याऐवजी विचारांच्या पातळीवर चर्चा व्हायला हवी. कारण लोकशाहीमध्ये मतभिन्नता ही स्वाभाविक असते, परंतु समाजहित हेच अंतिम ध्येय असले पाहिजे.

आजचा काळ हा संघर्षपेक्षा संवादाचा, द्वेषापेक्षा बंधुत्वाचा आणि विघटनापेक्षा परिवर्तनाचा आहे. म्हणूनच नव्या विचारांचे, नव्या नेतृत्वाचे आणि जागृत तरुणाईचे स्वागत केले पाहिजे कौतुक केले पाहिजे.

आपण अनेकदा तरुणांकडून अपेक्षा करतो की त्यांनी समाजासाठी काम करावे, देशासाठी योगदान द्यावे, संविधानाचे मूल्य जपावे. परंतु त्याच वेळी त्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्यास आपण तयार असतो का? त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न करतो का? जर आपण त्यांच्या भावना समजून घेतल्या नाहीत, तर त्यांच्या आणि समाजाच्या दरम्यान एक मोठी दरी निर्माण होऊ शकते.

इतिहास साक्षी आहे की,समाजातील प्रत्येक मोठ्या परिवर्तनामागे तरुण शक्ती उभी राहिली आहे.स्वातंत्र्यलढा असो, सामाजिक सुधारणा असोत किंवा अन्यायाविरुद्धचे आंदोलन असो तरुणांनी नेहमीच अग्रभागी राहून नेतृत्व केले आहे. त्यामुळे आजची तरुणाई जर प्रश्न विचारत असेल, नवे विचार मांडत असेल किंवा परिवर्तनाची मागणी करत असेल, तर त्याकडे संशयाने नव्हे तर सकारात्मक दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे.

समाजातील ज्येष्ठ, शिक्षक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते , पत्रकार आणि राजकीय नेतृत्व यांनी तरुणांशी संवाद वाढवला पाहिजे. त्यांना मार्गदर्शन केले पाहिजे, पण त्याचबरोबर त्यांचेही म्हणणे ऐकले पाहिजे. कारण संवाद हा एकतर्फी नसतो; तो परस्पर समजुतीवर आधारित असतो. जेव्हा तरुणांना वाटते की त्यांचे विचार ऐकले जात आहेत, तेव्हा त्यांचा समाजावरील विश्वास अधिक दृढ होतो.

आजच्या भारताला जागृत, संवेदनशील आणि जबाबदार तरुणांची गरज आहे. परंतु अशी तरुणाई घडवण्यासाठी त्यांना समजून घेणारा समाजही तितकाच आवश्यक आहे. विरोध, आरोप आणि टीका यांमधून प्रश्न सुटत नाहीत. प्रश्न सुटतात ते संवादातून, सहकार्यातून आणि परस्पर आदरातून.

म्हणूनच आज आपण सर्वांनी एक संकल्प केला पाहिजे तरुणांच्या आवाजाला विरोध करण्याऐवजी तो ऐकण्याचा. त्यांच्या मनातील वादळ समजून घेण्याचा. त्यांच्या स्वप्नांना दिशा देण्याचा. कारण आजचा तरुण हा उद्याचा भारत आहे. त्याच्या मनातील आशा जिवंत राहिल्या, तर देशाचा भविष्यकाळ उज्ज्वल राहील.

तरुणांच्या मनातील अस्वस्थता ही समाजासाठी धोक्याची घंटा नसून परिवर्तनाची चाहूल आहे. त्या चाहुलीला विरोधाने नव्हे, तर संवादाने उत्तर दिले पाहिजे. कारण संवाद समाज घडवतो, तर विरोध अनेकदा दुरावा निर्माण करतो. आणि जेव्हा समाज आपल्या तरुणांना समजून घेतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने प्रगती, परिवर्तन आणि लोकशाही मजबूत होते.

**समाजभूषण रामदास वच्छालामाई**
**रखमाजी वाघमारे, छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं.8888125610**

# भारताची राजकीय द्विपक्षीय पद्धतीकडे वाटचाल..?

मागील काही महिन्या पासून, खरंतर २०२४ मधील लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकी नंतरच छोट्या छोट्या पक्षांचं अस्तित्व डळमळीत झालं होत. लोकसभेत भाजपाला पक्ष म्हणून स्पष्ट बहुमत नसलं तरीही भाजपाच्या भोवती लोकसभेत बहुमत आहे. भारता सारख्या विविधतेने नटलेल्या देशात जो पक्ष तीस टक्के मत घेणारा पक्ष हा दिल्लीच्या नेहमीच केंद्र स्थानी असतो. खरं तर १९८९ नंतर काँग्रेस स्पष्ट बहुमताच्या दूरच होती, पण २०१४ पर्यंत दिल्लीच्या राजकारणात स्थिर राहिली. कोणाचीही तिसरी निवडणूक कोणालाही जरा कठीण जाते हा इतिहास आहे आणि सध्याचं वर्तमान देखील आहे. ह्या आधीची एक आठवण करून देणं मला महत्वपूर्ण वाटत, ती म्हणजे २०१९ मधील लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीतील पराभवा नंतर, जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला ह्यांनी एक वक्तव्य केलं होत. ते वक्तव्य होतं "विरोधकांनी २०२४ ऐवजी २०२९ ची तयारी करावी". खरं तर मला ते त्यावेळी पटल होतं. आणि त्याची प्रचिती आता येत आहे. मागील काही महिन्या पासून विशेषतः पश्चिम बंगाल मधील तृणमूल काँग्रेसच्या दारुण पराभवानंतर छोट्या छोट्या पक्षांनी काँग्रेसमध्ये विलीन व्हावं असा एक सुप्त आवाज येत आहे. आणि शरद पवार सारख्या दिग्गज राजकीय व्यक्तीने त्या विषयाला केंव्हाच दुजोरा दिला आहे. असच जर झालं तर देशाची वाटचाल ही "राजकिय द्विपक्षीय पद्धतीकडे जात आहे असं म्हणायला वाव आहे". २०१४ च्या लोकसभेच्या निवडणुका नंतर भारतातील प्रत्येक निवडणूक ही एक विशिष्ट चेहरा समोर करून लढवल्या जात आहे. अगदी अध्यक्षीय निवडणुकी सारखी. हेच जर चित्र प्रत्यक्षात समोर आलं तर निश्चित तो भारताचा फायदा होईल. आणि एका दृष्टीने जर झालं तर "एक देश एक निवडणूक" ह्या विषयाला देखील जोर मिळू लागेल, जे की भारता सारख्या विविधतेने नटलेला देशाला आर्थिक स्थैर्य द्यायला मदत होईल. त्यात काँग्रेस पक्ष अधिक बळकट होईल. पण नेतृत्व मात्र कोणी करायचं ह्यांवर प्रश्न चिन्ह कायम असेल. काँग्रेसला ह्या सर्वांना सामावून घेताना, परत त्याच बाबींचा विचार करावा लागेल ज्या बाबी पक्ष फुटताना झाल्या होत्या...

सत्तेचा अमरपट्टा घेऊन कोणीच आलेलं नसतं, कोणताही पक्ष कायम सत्तेत किंवा कायम सत्तेबाहेर राहील असंही नसतं, १९८३ पर्यंत ज्या भाजपला "दोन खासदारांची पार्टी" म्हणत होते तीच पार्टी आज तीनशेच्या पुढे खासदार निवडून आणत आहे, तर कधीकाळी चारशे खासदार असणारी काँग्रेस मात्र आज सत्तेसाठी तडफडत आहे. अनेक राज्यातून हद्दपार होत आहे. सत्तेला काय किंवा पक्षाला काय महत्वकांक्षेच ग्रहण लागत असतं, तसंच काँग्रेसला स्वातंत्र्या नंतर ग्रहण लागले होते. स्वातंत्र्योत्तर भारतात काँग्रेस मधून बाहेर पडून सत्तर पेक्षा जास्त गट आणि पक्ष स्थापन झाले आहेत. १९५१ मध्ये इंडियन नॅशनल डेमोक्रेटिक काँग्रेस, १९५९ सी.राजकोपलाचारी आणि के कामराज ह्यांच्या मतभेदातून झालेली स्वतंत्र पार्टी, १९६७ चौधरी चरणसिंग ह्यांची भारतीय क्रांती दल असो, १९६७ मध्येच बेंगोल काँग्रेस असो, के.एम जॉर्ज ह्यांची केरळ काँग्रेस असो, मणिपूर पीपल्स पार्टी सो, आर. काँग्रेस, ए. काँग्रेस, ओ. काँग्रस, यू.काँग्रेस, यु.आर.एस. काँग्रेस, समाजवादी काँग्रेस, इंदिरा काँग्रेस, काँग्रेस जन पेरावयी, अशा अनेक पार्ट्या काँग्रेस मधून फुटून तयार झाल्या आणि थांबल्याही. अजूनही काही मतभेदामुळे १९९८ ला स्थापन झालेली तृणमूल काँग्रेस असो, की १९९९ ला सोनिया गांधींच्या विदेशी मुद्यावरून शरद पवार, पी. ए. संगमा आणि तारिक अन्वर ह्यांनी स्थापन केलेली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी असो, की २०११ मध्ये काँग्रेस मधून बाहेर पडून जगन मोहन रेड्डी ने स्थापन केलेली वाय.एस.आर काँग्रेस असो ह्या आपल राजकीय अस्तित्व थोडेफार दाखवत होत्या. २०१४ पासून प्रत्येक छोट्या पक्षाला घरघर लागली होतीच तीच घरघर मागील काही वर्षापासून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट, काही महिन्या पासून तृणमूल काँग्रेसला लागलेले आहे. दोघेही आपल्या अस्तित्वासाठी झगडत आहेत. आणि दोन्हीही पक्षांचे प्रमुख जाणकार आणि राजकीय समज असलेले आहेत. त्यांनी निर्णय घेतल्यास काँग्रेसला थोडीतरी बळकटी येण्याची शक्यता आहे. अर्थात हे होत असतांनाही जिल्ह्यातील स्थानिक नेत्यांची भूमिका जाणून निर्णय घ्यायचा असेल तर तो जीकिरीचा ठरणार आहे. प्रत्येकाच्या राजकीय महत्वकांक्षा अतिशय वाढल्या आहेत. पण भारतात जर छोटे छोटे पक्ष काँग्रेस मध्ये विलीन होऊन भाजपला शह देण्यासाठी एकत्र येत असतील तर भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने त्याचे स्वागत केले पाहिजे. कारण बहुपक्षीय निवडणूक पद्धत ही आता परवडणारी राहिली नाही. द्विराजकीयपक्ष पद्धतीकडे भारत जात असेल तर त्याचे स्वागत करायला हवे. काँग्रेस आणि भाजपा अशी द्विपक्षीय पद्धत यायला हरकत नाही पण ह्यातही क्षेत्रीय पक्ष, त्यांच्या मानसिकता, आणि त्यातून येणारी राजकीय महत्वाकांक्षा हा शोधाचा विषय ठरणार आहे. २००० साला अगोदर संघटना असो की पक्ष असो, की आंदोलन असो हे जमिनीवर चालायचं आता मात्र ते पक्ष सोशल मीडियावर चालत. हा ही विषय भारता सारख्या लोकशाहीला परवडणार नाही. परवा परवा अमेरिकेत बसून सोशल मीडियावर स्थापन झालेली एक पार्टी, सोशल मीडियावर जीचे समर्थक वीस कोटी होते म्हणे, पण आंदोलनासाठी किमान एक टक्काही आले नाही ही शोकांतिका आहे. नव्हे ही लोकशाहीची मूल्य घसरवणारी पद्धत आहे. छोटे पक्ष जर काँग्रेसमध्ये विलय करून विरोधक आपली रेषा मजबूत करत असतील तर ते लोकशाहीला पोषक आहे ह्यात शंका नाही...

द्विपक्षीय राजकीय व्यवस्थेमध्ये (दोन-पक्षीय प्रणाली) अनेक योग्य बाबी आहेत त्यामध्ये सत्तेसाठी प्रामुख्याने दोनच मोठे राजकीय पक्ष स्पर्धा करतात. अनावश्यक पक्ष किंवा ज्याची जमीन पक्की नाही ते मतविभागणी करून सत्तेला किंवा विरोधी पक्षाला प्रभावित करू शकत नाहीत. या व्यवस्थेचा मुख्य फायदा म्हणजे सरकारला स्पष्ट बहुमत मिळते, ज्यामुळे सरकारची निर्णयप्रक्रिया जलद होते, वेळखाऊ राहत नाही. जो तो ज्याची त्याची ध्येय धोरण सामान्य व्यक्तिकरता ठरू शकतो आणि त्याला प्रभावीपणे दिशा देऊ शकतो. तसेच, ह्या द्विपक्षीय राजकीय पद्धतीने सध्याची चालू असलेली अस्थिरता टळते आणि विरोधी पक्ष मजबूत राहून सरकारवर प्रभावी नियंत्रण ठेवू शकतो. द्विपक्षीय राजकीय व्यवस्थेचे प्रमुख फायदे म्हणजे स्थिर सरकार असते. युती सरकारांपेक्षा एकाच पक्षाचे स्थिर सरकार हे जलद निर्णय घेऊ शकते, बहुमतामुळे धोरणे आणि कायदे जलद मंजूर करू शकतात. ह्या पद्धतीने स्पष्ट जबाबदारी देखील लक्षात येते . आणि अपयशासाठी देखील थेट एकाच पक्षाला जबाबदार धरता येते. जबाबदारी कोणीही झटकू शकत नाही. सत्ता जशी मजबूत हवी असते, तसाच मजबूत विरोधी पक्ष असतो. पराभूत पक्ष एक सशक्त विरोधी पक्ष म्हणून काम करतो. त्यालाही काम करायला सोप जात. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे मतदारांना सरकार निवडताना स्पष्ट व सोपे पर्याय मिळतात. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात असं झालं तर पश्चिमी देश त्यावर वेगळी दृष्टी ठेवतील हे वेगळ सांगायला नको. तो एक स्वतंत्र चर्चेचा विषय होईल. त्यात प्रादेशिक पक्षांची भविष्य काय.? हा प्रश्न येत असला तरी महाराष्ट्राचा विचार करता उध्दव ठाकरे ह्यांचा पक्ष फारसा प्रभावी राहिला नाही, आजही त्यांचे सात खासदार फुटणार अशी चर्चा आहे. मनसेला कोणी गांभीर्याने घेत नाही, मनसेप्रमुखांना लोकं पाहायला जातात त्याचे मतात परिवर्तन होत नाही. बहुजन समाज पार्टी अस्तित्वहीन झाली, रिपब्लिकन पार्टी त्याच स्थितीत आहे, डी. एम. के. ए. आई. डी. एम. के. वेगळी नाही, तामिळी राजकारण नेहमीच नट नटी भोवती फिरत, हीच स्थिती सर्व राज्यात थोडी फार सोडता सारखीच आहे. ह्याचे तोटे कमी पण फायदे अधिक आहेत त्यामुळे ही रचना झाली पाहिजे. हल्ली एकाच व्यक्तीचा चेहरा पुढे करून निवडणुका होत आहेत तर ती ही योग्य स्थिती आहे. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे सततच्या निवडणुकांमधून यंत्रणा आणि सामान्य माणसाना दिलासा मिळेल. निवडणुकीतील खर्चाचे आकडे पाहता तो खर्च देखील कमी होईल आणि देश सुजलाम सुफलाम बनेल ह्यात शंका नाही. त्यामुळे छोटे छोटे पक्ष मोठ्या पक्षात विलीन होऊन जर एकच समर्थ पर्याय देत असतील तर ते स्वागतार्ह आहे. तूर्तास असा निर्णय घेणाऱ्या पक्षांना शुभेच्छा...!

**विशाल वसंतराव मुळे**
**आजेगावकर...**

# जेएनपीए प्रशासनाविरोधात रांजनपाडा पेटले! रहिवासी जमीन औद्योगिक क्षेत्रात बदलण्यास भूमिपुत्रांचा तीव्र विरोध; न्यायालयीन लढ्याचा इशारा

दै हिंदू प्रकाश वार्ता

**उरण / रायगड :** जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने (JNPA) उरण तालुक्यातील रांजनपाडा जासई (सेक्टर-११) येथील रहिवासी वापरासाठी आरक्षित असलेली तब्बल ५१.७४ एकर (२०.९४ हेक्टर) जमीन औद्योगिक क्षेत्रात बदलण्याचा घाट घातला आहे. प्रशासनाच्या या मनमानी आणि अन्यायकारक प्रस्तावाविरोधात स्थानिक भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त आणि ग्रामस्थ कमालीचे संतप्त झाले असून उरणमध्ये पुन्हा एकदा संघर्षाची ठिणगी पडली आहे. ग्रामस्थ मंडळ रांजनपाडा यांच्या वतीने जेएनपीए प्रशासनाला कायदेशीर कलमांचा आधार घेत तीव्र जाहीर हरकत व आक्षेप पत्र पाठवण्यात आले असून हा प्रस्ताव त्वरित रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. ४५ वर्षांच्या ऐतिहासिक कराराचे उल्लंघन आणि फसवणुकीचा आरोप करत ग्रामस्थांनी प्रशासनाला थेट कायदेशीर आणि नैतिक सवाल केला आहे. उरणच्या भूमिपुत्रांनी आपल्या जमिनी दिल्यानंतर, दिवंगत लोकनेते दि.



बा. पाटील साहेबांच्या नेतृत्वाखाली साडेबारा टक्के (१२.५%) विकसित भूखंडांची ऐतिहासिक मागणी केली होती. त्यावेळी जेएनपीटी प्रशासनाने "जमीन कमी आहे" असे अधिकृत लेखी कारण पुढे करून प्रकल्पग्रस्तांचे हक्काचे प्लॉट २५ टक्क्यांनी कमी केले होते.आता ग्रामस्थांचा रोकडा सवाल आहे की, जर आज सेक्टर-११ मध्ये तब्बल ५१.७४ एकर जमीन उपलब्ध आहे, तर मग तेव्हा जमीन कमी असल्याचे खोटे कारण सांगून भूमिपुत्रांची फसवणूक का करण्यात आली ? प्रशासनाने 'Doctrine of Promissory Estoppel' (दिलेल्या आश्वासनापासून मागे न हटणे) या कायदेशीर तत्त्वाचा स्पष्ट भंग केला असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे.सदर निर्णयामुळे आरोग्य आणि पर्यावरणाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. प्रस्तावित औद्योगिक क्षेत्र हे थेट रहिवासी वस्तीच्या (सेक्टर-११) लागून येणार आहे. यामुळे होणारे वायू, जल आणि ध्वनी प्रदूषण थेट मानवी वस्तीवर आघात करेल. हा निर्णय नागरिकांच्या संविधानाच्या अनुच्छेद २१ (सन्मानाने जगण्याचा अधिकार) चे उघड उल्लंघन करणारा आहे. या परिसराजवळ आधीच बेकायदेशीर डंपिंग आणि वाढत्या औद्योगिकीकरणामुळे निसर्गाचा प्रचंड ऱ्हास झाला आहे. पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ चा दाखला देत ग्रामस्थांनी 'Sustainable Development' (शाश्वत विकास) या जागतिक नियमांची प्रशासनाकडून सर्रास पायमल्ली होत असल्याचे निदर्शनास आणले आहे. यामुळे वाहतूक कोंडी आणि अपघातांची भीती निर्माण झाली आहे. या ५१ एकर क्षेत्रफळावर औद्योगिक कारखाने आल्यास अंतर्गत रस्त्यांवर दररोज शेकडो डंपर, कंटेनर्स आणि अवजड वाहनांची वर्दळ वाढेल. परिणामी अंतर्गत रस्त्यांवर मोठी वाहतूक कोंडी होऊन शाळकरी मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या अपघातांचा धोका कमालीचा वाढेल आणि सार्वजनिक सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण होईल, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

सचिव मनीषा जाधव यांच्याशी चर्चा झाली तेंव्हा ग्रामस्थ आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. या गंभीर विषयावर रांजनपाडा गावातील प्रमुख शिष्टमंडळाने जे. एन. पी. टी. सचिव मनीषा जाधव यांची प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा केली. या बैठकीत रांजनपाडा गावाचा या निर्णयाला संपूर्ण आणि जाहीर विरोध असल्याचे प्रशासनाला ठणकावून सांगण्यात आले.

या महत्त्वपूर्ण चर्चेप्रसंगी गावातील प्रमुख मान्यवर आणि कार्यकर्ते सर्वश्री रमाकांत म्हात्रे, मुरलीधर ठाकूर, अलंकार कडू, सुदर्शन पाटील, सुरेश पाटील, प्रविण नाईक, विजय नाईक, तेजस पाटील, माधव पाटील आणि संतोष ठाकूर उपस्थित होते.

**ग्रामस्थांच्या मुख्य आणि आक्रमक मागण्या:**

**प्रस्ताव रद्द करा:** रांजनपाडा जासई नोड (सेक्टर-११) मधील रहिवासी जमीन औद्योगिक क्षेत्रात बदलण्याचा प्रस्ताव त्वरित आणि कायमचा रद्द करण्यात यावा.

**भूखंड वाटप:** सिडकोच्या (CIDCO) उलवे नोडप्रमाणे प्रकल्पग्रस्तांना येथे हक्काचे पूर्ण विकसित भूखंड वाटप करण्यात यावेत.

**जनसुनावणी घ्या:** कोणताही अंतिम निर्णय घेण्यापूर्वी जेएनपीए प्रशासनाने रांजनपाडा जासई गावात प्रत्यक्ष 'जाहीर जनसुनावणी' (Public Hearing) आयोजित करून जनतेची बाजू ऐकून घ्यावी.

या आक्षेप पत्राच्या प्रती केवळ जेएनपीएलाच नव्हे, तर राज्याचे पर्यावरण मंत्री, नगरविकास मंत्री, रायगडचे जिल्हाधिकारी आणि स्थानिक आमदार व खासदार यांनाही पुढील कडक कारवाईसाठी पाठवण्यात आल्या आहेत. त्यामुळे आगामी काळात हा वाद आणखी पेटण्याची चिन्हे दिसत आहेत

## थेट उच्च न्यायालय आणि 'एनजीटी'चा इशारा

"स्थानिक जनतेला आणि भूमिपुत्रांना विश्वासात न घेता प्रशासनाने जर हा प्रस्ताव जबरदस्तीने लादण्याचा प्रयत्न केला, तर आम्ही शांत बसणार नाही. आम्ही आमच्या कायदेशीर अधिकारांचा वापर करून माननीय उच्च न्यायालय (High Court) किंवा राष्ट्रीय हरित लवाद (NGT) कडे धाव घेऊ," असा थेट आणि आक्रमक इशारा रांजनपाडा येथील बाधित नागरिक, भूमिपुत्र आणि ग्रामस्थांनी दिला आहे.

# श्री.स्वामी समर्थ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित,आमखेडा ता.सोयगाव यांची 23 वी वार्षिक सर्व साधारण सभेचे आयोजन

**सोयगाव,दि.१२ जून :** श्री.स्वामी समर्थ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित,आमखेडा ता.सोयगाव यांची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन दि.२६ शुक्रवार रोजी सकाळी १०.३० वाजता हॉटेल अमृत इन (गार्डन) सोयगाव- जरंडी रोड कंकराळा पासून १.५. कि.मी.अंतरावर संस्थेचे अध्यक्ष ॲड.राजेश(भैय्या)अमृत गिरी यांच्या अध्यक्षतेखालील ठेवण्यात आली आहे.सदर सभे मध्ये मागील सर्व साधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे, सन.२०२५-२६ या वर्षाचे संचालक मंडळाने मंजूर केलेले आर्थिक पत्रके वाचून मंजूर करणे,सन.२०२५-२६ मध्ये अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे,सन.२०२५-२६ करिता संचालक मंडळाची शिफारस केलेल्या अंदाज पत्रकास वाचून मंजुरी देणे,नफा विभागणी व लाभांश वाटपास मान्यता देणे,सन.२०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता लेखा परीक्षकाची नियुक्ती करणे बाबत,अशा ऐनवेळी येणा-या विषयावर चर्चा करणे बाबत,व या पतसंस्थांच्या मार्फत सामाजिक व राष्ट्रीय बांधिलकी अंतर्गत संस्थेचे काही ठळक उपक्रम संस्थेने जि.प.कन्या प्रशाला सोयगाव यांना डिजिटल व्हच्युअल रुम साठी निधी दिला,हनुमान मंदिर रामजीनगर वॉल कंपाऊंड जाळीसाठी निधी दिला,माळेगांव पिंप्री येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरासाठी आवश्यक त्या लाईट फिटिंग साठी निधी दिला,गलवाडा येथील विठ्ठल रुक्मिणनी प्राणप्रतिष्ठेस निधी दिला,अशा अनेक ठिकाणी संस्थेमार्फत सामाजिक उपक्रमात निधीची तरतूद करून वितरीत केला जातो असे यावेळी सांगितले.तसेच संस्थेचे संचालक,सभासद,प्रमुख पाहुणे हे उपस्थित राहतील असल्याची माहिती श्री.स्वामी समर्थ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित,आमखेडा ता.सोयगाव अध्यक्ष श्री.स्वामी समर्थ ॲड राजेश (भैय्या) गिरी,पतसंस्थेचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर पाटील,कॅशियर सुनील सैंदाने, गणेश पवार यांनी सांगितले.

# सौरव जाधवची प्री-नॅशनल नेमबाजी स्पर्धेसाठी निवड



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र रायफल असोसिएशनतर्फे मुंबई येथील एमआरए रेंज, वरळी येथे आयोजित २९ व्या कॅप्टन एस. जे. इझेकियल मेमोरियल महाराष्ट्र राज्य नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धा (नवोदित) २०२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत युवा नेमबाज सौरव जाधव याने प्री-नॅशनल स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. विशेष म्हणजे, अवघ्या दोन महिन्यांच्या प्रशिक्षणात सौरवने हे यश संपादन करून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील समाजसेवक डॉ. रविराज जाधव यांचा तो चिरंजीव आहे. सौरव हा लॉक एन लोड शूटिंग अरेना येथे प्रशिक्षण घेत असून त्याला आंतरराष्ट्रीय पिस्तूल नेमबाज तसेच विश्वचषक आणि आशियाई अजिंक्यपद स्पर्धांतील पदकविजेते सुमेध कुमार यांचे वैयक्तिक मार्गदर्शन लाभले. याशिवाय शिरीष देव यांचे विशेष मार्गदर्शन आणि प्रशिक्षक चिन्मय देशपांडे यांचे तांत्रिक मार्गदर्शनही त्याला लाभले. राज्यस्तरीय स्पर्धेतील या यशामुळे सौरवची आगामी प्री-नॅशनल स्पर्धेसाठी निवड झाली असून भविष्यातही तो राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करून छत्रपती संभाजीनगरचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास त्याच्या प्रशिक्षकांसह क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केला आहे.

# अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी घाटीत मॅकेनिक बांधवांची सेवा सुरूच

## मेडिसिन विभाग, मध्यवर्ती ग्रंथालय, अपघात विभागात दिली सेवा

**छत्रपती संभाजीनगर ( प्रतिनिधी ) :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) हे मराठवाडा खान्देश, विदर्भासह राज्यातील 16 जिल्ह्यांचे आरोग्यकेंद्र बनले आहेत. त्यामुळे येथे नेहमीच रुग्ण आणि नातेवाईकांची गर्दी पाहायला मिळते. घाटी प्रशासन उच्चदर्जाची रुग्णसेवा आणि सोईसुविधा देत असल्याने गर्दी वाढत आहे. यामुळे येथील सेवेत खारीचा वाटा म्हणून औरंगाबाद टू व्हिलर मॅकेनिक असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर शाखा यांनी मोफत सेवा सुरू केली आहे.

घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या



मार्गदर्शनाखाली औरंगाबाद टू व्हिलर मॅकेनिक असोसिएशन, छत्रपती संभाजीनगरचे संस्थापक चांद सय्यद यांनी ही संकल्पना सुरु केली.

शुक्रवार, 5 जून रोजी बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) येथे शहर पदाधिकारी यांनी जवळपास 30 खुर्च्या, सहा स्ट्रेचर आदीची वेल्डिंग आणि दुरुस्ती केली. यानंतर सोमवार, 8 जून रोजी पैठण येथील ग्रामीण पदाधिकारी यांनी मेडीसिन विभागात पेशंटचे 25 बेडसह ट्रॉली, खुर्च्या, स्टूलची दुरुस्ती केली गेली. शुक्रवार, 12 जून रोजी फुलंब्री येथील पदाधिकारी यांनी मध्यवर्ती ग्रंथालय येथे 38 खुर्च्या, अपघात विभागातील 3 स्ट्रेचर, 3 व्हिलचेयर, मेडिसिन विभागातील उर्वरित 14 पेशंट बेड आदि दुरुस्त केले. याप्रसंगी पैठण मॅकेनिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा औरंगाबाद टू व्हीलर मेकॅनिक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव कुमावत, माजी अध्यक्ष जनार्दन गरसुळे, महादेव महापुरे, संतोष लोहगळे, जिल्हा उपाध्यक्ष शेख नुर, चॉंद सय्यद यांनी योगदान दिले. ग्रंथालय येथे ग्रंथपाल डॉ. संतोष शेळके, लिपिक मुराद शेख आदींनी सहकार्य केले. यावेळी फुलंब्री मॅकेनिक संघटनेचे अध्यक्ष विष्णू गायकवाड, उपाध्यक्ष कृष्णा तुपे, विभागप्रमुख विठ्ठल साबळे, साजेद मन्सुरी, अजिनाथ पवार, दिनेश भाकरे, शोहेब मन्सूरी, जिल्हा उपाध्यक्ष मुन्ना शेख, शेख नुर ,

पडेगाव येथील विभागप्रमुख संदिप भालेकर, संस्थापक अध्यक्ष सय्यद चांद सय्यद सहभागी झाले होते.

# सोयगाव तालुक्यातील नांदगाव येथे बाल आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१२ जून :** तालुक्यातील नांदगाव येथील अंगणवाडीत प्रकल्प कार्यालय व राष्ट्रीय बाल सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत बाल आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. वैद्यकीय अधिकारी डॉ.झाकी यांनी आरोग्य तपासणी करून २० बालकांना मोफत औषधी वाटप करण्यात आली.यावेळी संजय शहापूरकर यांनी सांगितले की कुपोषण कमी करण्यासाठी तालुक्यात सर्वत्र अंगणवाड्यात आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले. असून त्यांना मोफत औषधी वाटप करण्यात येणार आहे. डॉ.पठाण यांनी याप्रसंगी बालकाच्या मातांना मार्गदर्शन केले.अंगणवाडी सेविका संगीता परदेशी,कविता चव्हाण, तसेच मदतनीस यांची उपस्थिती होती.

# शिवसेनेची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत; मतदान केंद्रनिहाय बी.एल.ए. नियुक्तीवर जोर



**बीड :** शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या बीड जिल्ह्यातील पदाधिकारी व शिवसैनिकांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक आज संपन्न झाली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, पदवीधर मतदारसंघ तसेच इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक तयारीचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला. बैठकीत बी.एल.ए. नियुक्तीचा आढावा, स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील तयारी, पदवीधर मतदारसंघातील संघटनात्मक स्थिती व नियोजन, तसेच स्थानिक पातळीवरील पक्ष संघटनेच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. प्रत्येक तालुका व जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांकडून कामकाजाचा अहवाल जाणून घेत आगामी काळातील संघटनात्मक बांधणीसंदर्भात आवश्यक सूचना करण्यात आल्या. आगामी निवडणुकांच्या दृष्टीने पक्ष संघटना अधिक सक्षम करण्यावर भर देत बूथस्तरापर्यंत पक्षाचे जाळे मजबूत करण्याचे निर्देश दिले. शिवसैनिकांनी जनतेच्या प्रश्नांशी जोडले जाऊन पक्षाची भूमिका प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवावी तसेच प्रत्येक निवडणुकीसाठी सज्ज राहावे, असे आवाहन अंबादास दानवे यांनी केले.

याप्रसंगी संपर्कप्रमुख परशुराम जाधव, पदवीधर समन्वयक दिलीप घुगे, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, उल्हास गिराम, रत्नाकर शिंदे, परमेश्वर सातपुते, कुंडलिक खांडे, जिल्हा संघटक नितीन धांडे तसेच महिला आघाडी जिल्हा संघटक मीरा नवले यांची प्रमुख उपस्थिती होती.

# महेंद्रशेठ घरत यांचा साई मंदिर वहाळतर्फे सत्कार

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत हे आंतरराष्ट्रीय कामगार शिखर परिषदेसाठी आपल्या वाढदिवसासह सर्व पूर्वनियोजित कार्यक्रम रद्द करून जिनेव्हा येथे गेले होते. कारण तेथे जगातील कामगारांच्या हक्कांसाठी कायदे बनविले जातात. ही संधी महेंद्रशेठ घरत यांना दुसऱ्यांदा मिळाली. साहजिकच वाढदिवसानिमित्त त्यांना प्रत्यक्ष भेटून अनेकांना शुभेच्छा देता आल्या नाहीत. महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी महेंद्रशेठ घरत हे वहाळच्या साई मंदिरात अन्नदान करतात. त्यामुळे गुरुवारी (ता.११) महेंद्रशेठ घरत हे साई मंदिरात आरती आणि अन्नदान उपक्रमासाठी उपस्थित




होते. त्यावेळी साई मंदिर वहाळतर्फे त्यांचा आंतरराष्ट्रीय शिखर परिषदेत सहभागी होण्याचे भाग्य लाभले त्याबद्दल आणि वाढदिवसानिमित्त मो. का. मढवी गुरुजी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच एमटीएचएलचे चिफ रेसिडेंट इंजिनियर रतनलाल देशमाने यांचाही यथोचित सन्मान साई मंदिरतर्फे करण्यात आला.

यावेळी राधाकृष्ण बालगोपाल भजन मंडळ हरिग्राम (पनवेल) यांचे सुश्राव्य भजन झाले. गायिका प्रतिज्ञा सुरेश पाटील यांनी अप्रतिम भजन सादर करून साईभक्तांना जिंकले. त्यांना प्रसाद पाटील यांनी पखवाजवर साथ केली, तसेच प्रज्ञा, आर्या, तनिष्का, खुशी यांनी कोरस म्हणून उत्तम साथ दिली. त्यामुळे महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते गायिका प्रज्ञा पाटील हिचा सन्मान करण्यात आला. यावेळी साईबाबांचे मंगलस्नान करण्याचा मान आनंद नारायण ठाकूर आणि नयना आनंद ठाकूर यांना मिळाला होता; तर अन्नदान महेंद्रशेठ घरत आणि शुभांगीताई घरत यांच्यातर्फे करण्यात आले. यावेळी साई मंदिर व्यवस्थापन सांभाळण्यासाठी सक्रिय असणाऱ्या सेवाभावी भक्तांची दखलही महेंद्रशेठ घरत यांनी घेतली. यावेळी साई मंदिराचे अध्यक्ष रविशेठ पाटील, मो. का.

# सिल्लोड तालुक्यातील हट्टी येथे एचआयव्ही तपासणी व गुप्तरोग तपासणी शिबिर संपन्न




**अजिंठा प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग अंतर्गत जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्रीमती साधना गंगावणे , जिल्हा पर्यवेक्षक श्री संजय पवार , आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्था या संसथेचे प्रकल्प संचालक श्री अप्पासाहेब पाटील उगले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेच्या जिल्हा साधन व्यक्ती श्रीमती अन्नपूर्णा मॅडम यांच्या उपस्थितीत आज दिनांक 12/6/2026 रोजी मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGVS) छत्रपती संभाजीनगर अंतर्गत लिंकवर्कर प्रकल्पातील हट्टी गाव तालुका सिल्लोड येथे उंडणगाव प्राथमिक आरोग्य केंद्र आणी लिंकवर्कर प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने हेल्थ कॅम्प घेण्यात आला, कॅम्प उपकेंद्र हट्टी येथे घेण्यात आला.

सदर कॅम्प मध्ये एकुण 58. लोकांचे एचआयव्ही व गुप्तरोग तपासणी करण्यात आली यात उपस्थित लोकांचे एचआयव्ही तपासणी श्रीमती वनिताजी शिनगारे सुपरवायझर यांनी केली व उपस्थित लोकांना एचआयव्ही एड्स विषयी सविस्तर माहिती लिंक वर्कर अरुण चव्हाण देशमुख यांनी दिली तसेच इतर लोकांची शुगर बीपी तपासून त्यांना योग्य तो वैद्यकीय सल्ला डॉक्टर विशाल सोळंके वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र उंडणगाव यांनी दिला यावेळी उपस्थित सुवर्णा जी हिवाळे मॅडम समुदाय आरोग्य अधिकारी रामकृष्ण डोईफोडे सर पर्यवेक्षक एच ए आरोग्य सेवक अविनाश जी दसरे आकाश जी आरके प्रयोगशाळा तंत्रज्ञ सोनाली जी चौधरी आरोग्य सेविका पूजा जी वरपे सिस्टर दिपालीताई सोनवणे सिस्टर आशा वर्कर संगीता भोटकर वैशाली बनसोडे मंगला जरारे लता अग्रवाल पि टी व उंडणगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे अधिकारी कर्मचारी या वेळी उपस्थित होते तसेच उपस्थित लोकांना लिंक वर्कर अरुण चव्हाण देशमुख यांनी लिंक वर्कर प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती देऊन या कॅम्प मध्ये इतर राज्यातील कामगारांचे सुद्धा एचआयव्ही तपासणी करण्यात आली

तसेच उपस्थित लोकांना एचआयव्ही होण्याचे मुख्य चार कारणे सांगण्यात आले व आपल्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी त्याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले तसेच मध्यप्रदेश व बिहार राज्यातून आलेले स्थलांतरित कामगार व्यक्तींची सुद्धा केली एच आय व्ही तपासणी हा कॅम्प यशस्वी करण्यासाठी श्री रामकृष्ण डोईफोडे सर पर्यवेक्षक यांनी विशेष परिश्रम घेतले व नियोजन केले आणि उपस्थित सर्व लोकांना आरोग्य विषयी सविस्तर माहिती दिली

# श्री क्षेत्र वेरूळ नाथ आश्रम येथे अखंड श्रीराम नाम जप ची ह भ प अनिल महाराज तुपे यांच्या काल्याचे किर्तनाची सांगता

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**खुलताबाद, प्रतिनिधी :** श्रीक्षेत्र नाथ आश्रम, वेरूळ येथे प.पू. साध्वी सद्गुरू नाथयोगिनी श्री आक्का महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली अखंड श्रीराम नाम जप व कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात होते हा धार्मिक सोहळा अधिक ज्येष्ठ शुद्ध ८, शुक्रवार दि. ५ जून २०२६ रोजी प्रारंभ होऊन अधिक ज्येष्ठ शुद्ध १५, शुक्रवार दि. १२ जून २०२६ रोजी काल्याचे किर्तन सांगता करण्यात आली

या राम नाम जपा मध्ये. २०० भाविक भक्तांनी दैनंदिन भाग घेऊन सात लक्ष राम नाम जप करून एक अखंड सेवेचा नाथ आश्रम या ठिकाणी उच्चांक केला ह भ प अनिल महाराज तुपे यांनी या श्रीराम जपानच्या बाबतीत किर्तन सेवेदरम्यान आपल्या रसाळ वाणीतून श्रीराम प्रभू चे विचार आचार आपल्या दैनंदिन जीवनात आणून व्यसनापासून दूर राहा साधुसंतांची संगत करा



जीवनाची कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही असे म्हटले

या सप्ताहात दररोज पहाटे काकडा भजन, सकाळी आरती, विष्णू सहस्रनाम, हनुमान चालीसा, हरिपाठ, प्रवचन, कीर्तन सेवा, भजन आणि रात्री हरिजागर यांसारखे विविध धार्मिक कार्यक्रम करण्यात . आले

विविध भागांतील नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार व भजनी मंडळी या कार्यक्रमात सहभागी झाली होती


कार्यक्रमाच्या प्रारंभी दि. ५ जून रोजी ह.भ.प. गणेश महाराज नावडे (आळंदी) यांचे कीर्तन होणार असून त्यानंतर ह.भ.प. महेश महाराज गलांडे (वेरूळ), ह.भ.प. गोपाळ महाराज (चिंचोली), ह.भ.प. कृष्णा महाराज चव्हाण (वेरूळ), ह.भ.प. संदीप महाराज पेकळवाडीकर, ह.भ.प. कल्याण महाराज पुंजा (बाजारनगर) आणि ह.भ.प. संतोष महाराज भोसले (गोळेगाव, ता. गंगापूर) यांची कीर्तन सेवा होणार आहे.

सप्ताहाची सांगता शुक्रवार दि. १२ जून रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. अनिल महाराज तुपे (बाभुळगाव, नाशिक) यांच्या काल्याच्या कीर्तनाने दहीहंडी फोडून सांगता झाली याप्रसंगी फुलंब्री पंचायत समितीचे माजी सभापती विवेक चव्हाण वेरूळ गावचे सरपंच कुसुमताई प्रकाश पाटील मिसाळ भाजपाचे ज्येष्ठ नेते अशोक आबा साळुंखे गोलटगावकर नारायण बाबर्डे संतोष करपे. कल्पनाताई कदम दामू अण्णा गवळी श्रीरंग साबळे नकुल महाराज गव्हाणे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती त्यानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली

या धार्मिक सोहळ्यास महाराष्ट्रातील विविध भागांतील नाथ भक्त , वारकरी, भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

# अमावास्येनिमित्त जैनगिरी येथे पंचामृत अभिषेक व महाप्रसाद

## 15 जून रोजी धार्मिक कार्यक्रम



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरापासून १२ कि.मी. अंतरावर असलेल्या हजारो जैन बांधवांचे श्रद्धास्थान असलेले श्री १००८ संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र, जैनगिरी (जटवाडा) येथे दिनांक १५ जून २०२६, सोमवार रोजी सकाळी १० वाजता मूलनायक श्री संकटहर पार्श्वनाथ भगवंताचा पंचामृत अभिषेक णमोकार भक्ती मंडळच्या सानिध्यात करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास आचार्य सिद्धांत सागर महाराज ससंघ यांचे सानिध्य लाभणार असून यावेळी आचार्यश्रींचे प्रवचन व पादपक्षालन होणार आहे. तसेच उपस्थित समाजबांधवांना सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत श्रीमती शंकुतलाबाई रमनलालजी बाकलीवाल (पाचोडवाला) यांच्या प्रेरणेने श्रीमती रीनादेवी शीतलकुमारजी प्रवेश नमन बाकलीवाल परिवार (पाचोडवाला) व छाबडा परिवार, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने महाप्रसाद दिला जाणार आहे. अमावास्येनिमित्त सकाळी १० वाजता मूलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक, नित्यनियम पूजा होऊन भगवंताची आरतीही करण्यात येणार आहे. तरी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाप्रसादी परिवार व जटवाडा क्षेत्राचे विश्वस्त मंडळातर्फे करण्यात आले आहे.

# जिन्सी पोलीस ठाण्यात नशामुक्ती, गोवंश हत्या प्रतिबंध आणि गुन्हेगारी नियंत्रणावर भर परंतु मनुष्यबळाची कमतरता

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिन्सी पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाढती गुन्हेगारी, अमली पदार्थांचा वाढता प्रादुर्भाव आणि गोवंश हत्येच्या घटनांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी पोलीस प्रशासनाने विविध उपाययोजनांवर भर देण्यास सुरुवात केली आहे. कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नशामुक्ती अभियान, गुन्हे प्रतिबंधक कारवाया आणि माहिती संकलन मोहिमेला प्राधान्य देण्यात येणार आहे.

रवींद्रनगर येथे पोलीस चौकी मंजूर असूनही ती अद्याप सुरू झालेली नाही. आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध झाल्यास चौकी कार्यान्वित करण्याचा प्रयत्न केला जाणार असून त्यामुळे परिसरातील गुन्हेगारी नियंत्रणास मदत होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. सध्या जीन्सी पोलीस ठाण्यात दोन सहाय्यक पोलीस निरीक्षक, सहा तपास अंमलदार आणि एकूण ८९ कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र या संख्येमध्ये समन्स व वॉरंट बजावणी करणारे कर्मचारी, वाहन चालक, महिला पोलीस कर्मचारी, कार्यालयीन कामकाज सांभाळणारे कर्मचारी तसेच विविध शाखांमध्ये नियुक्त कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.



**"जीन्सी. पोलीस ठाण्याची हद्द संवेदनशील असून नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. नशामुक्ती, गोवंश हत्या प्रतिबंध आणि गुन्हेगारी नियंत्रणासाठी प्रभावी कारवाई करण्यात येईल. उपलब्ध मनुष्यबळाच्या मर्यादा असल्या तरी पोलीस दल पूर्ण क्षमतेने काम करेल." —**

**- गणेश ताठे, पोलीस निरीक्षक जीन्सी पोलीस ठाणे**

परिणामी, पोलीस ठाण्याच्या विस्तृत आणि संवेदनशील हद्दीत गस्त, बंदोबस्त आणि गुन्हे प्रतिबंधक कारवायांसाठी प्रत्यक्षात मर्यादित मनुष्यबळ उपलब्ध राहते. वाढती लोकसंख्या, वाढणारे शहरीकरण आणि विविध प्रकारच्या गुन्हेगारी घटनांच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध कर्मचारी संख्या अपुरी पडत असल्याचे चित्र असून, अतिरिक्त मनुष्यबळाची गरज प्रकर्षाने जाणवत आहे. विस्तारित हद्दीत प्रभावी पोलिसिंग करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अमली पदार्थांच्या विक्री व सेवनाविरोधात कठोर कारवाई करण्याबरोबरच युवकांमध्ये जनजागृती करून नशामुक्ती अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. तसेच गोवंश हत्येसारख्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांवरही विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. विविध कंपन्या, हॉटेल्स आणि इतर आस्थापनांमध्ये कामासाठी येणाऱ्या परप्रांतीय नागरिकांची माहिती संकलित करून आवश्यक पडताळणी करण्याची मोहीमही राबविण्यात येणार आहे.

नुकतेच जीन्सी पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारलेल्या पोलीस निरीक्षक गणेश ताठे यांनी नागरिकांच्या सहकार्याने कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# उपवर्गीकरणाविरोधातील लाँग मार्चसाठी 25 जूनला शहरातून वाहनांचा ताफा मुंबईकडे रवाना

## आरपीआय महाराष्ट्राच्या बैठकीत निर्णय; पक्ष संघटन बळकटीकरणावरही चर्चा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** उपवर्गीकरणाविरोधात १० जून रोजी बीड ते मुंबई दरम्यान काढण्यात आलेल्या लाँग मार्चमध्ये सहभागी होण्यासाठी तसेच आगामी काळात पक्ष वाढीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्र पक्षाची महत्त्वपूर्ण बैठक येथील सुभेदारी विश्रामगृह येथे संपन्न झाली. पक्षाचे पक्षप्रमुख राजुभाई साबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडली.

बीड येथून निघालेला हा लाँग मार्च २६ जून रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर धडकणार आहे. या मार्चला सक्रिय पाठिंबा दर्शविण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथून २५ जून रोजी रिपब्लिकन पार्टी



ऑफ महाराष्ट्र पक्षाचा चारचाकी वाहनांचा मोठा ताफा मुंबईकडे रवाना होणार असल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय या बैठकीत एकमताने घेण्यात आला.

यासोबतच आगामी काळात संपूर्ण राज्यात पक्ष संघटना अधिक मजबूत करणे आणि पक्षवाढीसाठी गतीने काम करणे यावरही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी अँड. अविनाश शिट्टे (राज्य उपाध्यक्ष), वैभव लोखंडे (राज्य सहसचिव), सुनील खरात (मराठवाडा उपाध्यक्ष), सचिन नवगिरे (मराठवाडा कार्याध्यक्ष), रवि मोरे (जिल्हा सचिव), संतोष उणवणे (कामगार आघाडी शहराध्यक्ष), जवाहर भगुरे (रुग्ण न्याय हक्क आघाडी शहराध्यक्ष), कल्पना ताई जमधडे, मध्य शहराध्यक्ष सिद्धार्थ बोर्डे, विकास साबळे, प्रकाश घोरपडे, अमित मोरे, रमजानी भाई आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# सुहास शिरसाठ यांच्या प्रचारार्थ भाजप नगरसेवकांची बैठक संपन्न

## स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणुकीसाठी प्रचार नियोजन व रणनीतीवर चर्चा




हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर व जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाचे भारतीय जनता पक्षाचे उमेदवार सुहास शिरसाठ यांच्या प्रचारार्थ भाजपा विभागीय कार्यालयात सर्व नगरसेवक व नगरसेविकांची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या बैठकीत प्रचाराचे नियोजन, निवडणूक रणनीती, संघटनात्मक बळकटीकरण तसेच बूथस्तरावरील तयारीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मतदारांपर्यंत पक्षाची भूमिका आणि उमेदवाराचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी आवश्यक प्रचारयंत्रणा उभारण्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. तसेच निवडणुकीतील विविध पैलूंवर उपस्थित पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी कार्यकर्त्यांना सूचना दिल्या.

यावेळी महाराष्ट्र शासनाचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, माजी आमदार संजय केनेकर, महापौर समीर राजुरकर, माजी महापौर बापू घडामोडे, भाजपा प्रदेश सचिव प्रवीण घुगे, बसवराज मंगरुळे, हर्षवर्धन कराड, छाया खाजेकर, रामेश्वर भादवे, ताराचंद गायकवाड यांच्यासह शहरातील सर्व नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते.

बैठकीत सुहास शिरसाठ यांच्या विजयासाठी संघटितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच प्रत्येक प्रभाग आणि बूथस्तरावर प्रभावी नियोजन करून मतदारांपर्यंत पोहोचण्याचे आवाहन उपस्थित नेत्यांनी केले.

# स्लॅब भरताना तरुणाचा तोल गेल्याने पडून मृत्यू

**पाचोड :** पैठण तालुक्यातील पाचोड येथे घराच्या स्लॅबचे काम सुरू असताना एका २४ वर्षीय तरुणाचा तोल जाऊन खाली पडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी (दि. १२ जून) दुपारी सुमारे चार वाजण्याच्या सुमारास शिवाजीनगर परिसरात घडली. प्रदीप मुकेश पिंपळे (वय २४, रा. पाचोड) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रदीप पिंपळे यांचे कुटुंब मागील सुमारे तीस वर्षांपासून पाचोड येथे वास्तव्यास असून बिगारी व प्लंबिंगच्या कामातून उदरनिर्वाह करत होते. प्रदीप हे आपल्या वडिलांसोबत बांधकाम क्षेत्रातील विविध कामांमध्ये हातभार लावत होते. मागील काही दिवसांपासून पाचोडच्या शिवाजीनगर भागातील संतोष मेहतर यांच्या घराचे स्लॅब भरण्याचे काम सुरू होते. शुक्रवारी दुपारच्या सुमारास प्रदीप पिंपळे हे इतर कामगारांसोबत स्लॅब भरण्याच्या कामात व्यस्त होते.

# अतिसार थांबवा अभियान : 2.10 लाख बालकांसाठी ओआरएस व झिंक गोळ्यांचे वाटप

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** अतिसारामुळे होणारे बालमृत्यू शून्यावर आणण्याच्या उद्देशाने जिल्ह्यात १६ जून ते ३१ जुलैदरम्यान "अतिसारावर करा मात, स्वच्छता आणि ओआरएसची घेऊनी साथ" या घोषवाक्याखाली 'अतिसार थांबवा' अभियान राबविण्यात येणार आहे. अभियानांतर्गत पाच वर्षांखालील बालकांना ओआरएस पाकिटे व झिंकच्या गोळ्यांचे वाटप करण्यात येणार असून, पालकांना अतिसार प्रतिबंध आणि योग्य व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

उन्हाळा व पावसाळ्याच्या काळात अतिसाराच्या संभाव्य घटनांना आळा घालण्यासाठी आरोग्य विभागाने व्यापक नियोजन केले आहे. ग्रामीण व शहरी भागांसह झोपडपट्ट्या, वीटभट्ट्या, पूरग्रस्त क्षेत्रे तसेच दुर्बल व वंचित घटकांतील बालकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

अभियानादरम्यान पाच वर्षांखालील बालकांच्या घरांमध्ये ओआरएस व झिंकची उपलब्धता वाढविणे, अतिसाराचे लवकर निदान व उपचार सुनिश्चित करणे तसेच जलशुष्कतेने ग्रस्त बालकांच्या उपचारासाठी आरोग्य संस्थांचे बळकटीकरण करण्यावर भर दिला जाणार आहे. याशिवाय अतिसार प्रतिबंधासाठी जनजागृती, प्रचार-प्रसार आणि संवाद मोहिमाही राबविण्यात येणार आहे.

मागील दोन वर्षांत अतिसाराची साथ आढळलेल्या भागांबरोबरच पाणीपुरवठा व स्वच्छतेचा अभाव असलेल्या क्षेत्रांवर विशेष लक्ष दिले जाणार आहे. महिला व बालविकास, नगर विकास, पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास तसेच शिक्षण विभाग यांच्या समन्वयातून अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील २ लाख १० हजार बालकांसाठी अडीच लाख ओआरएस पाकिटे आणि ४ लाख ६ हजार ७०० झिंकच्या गोळ्यांचा पुरवठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच 'माझे गाव आरोग्य संपन्न' या संकल्पनेला बळ देण्यासाठी गावपातळीवर स्वच्छता, सुरक्षित पाणीपुरवठा आणि अतिसार प्रतिबंधाबाबत व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे.

३१ जुलैपर्यंत चालणाऱ्या या अभियानाचा लाभ संबंधित लाभार्थ्यांनी घ्यावा तसेच घरोघरी भेट देणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक तसेच जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी यांनी केले आहे.


अतिसार झाल्यास बालकाला त्वरित ओआरएस द्रावण पाजावे, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार झिंकच्या गोळ्या द्याव्यात, स्तनपान व नियमित आहार सुरू ठेवावा तसेच जलशुष्कतेची लक्षणे दिसल्यास तातडीने जवळच्या आरोग्य संस्थेत उपचार घ्यावेत, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# न्हावे गावात भीषण पाणीटंचाई; 15 दिवसांनी अवघ्या 30 मिनिटांचा पाणीपुरवठा, ग्रामस्थ संतप्त

दै हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** पनवेल तालुक्यातील न्हावे गावात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. गावात ग्रामपंचायतीमार्फत तब्बल १४ ते १५ दिवसांनी केवळ ३० मिनिटांसाठी पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून प्रश्न सोडवावा, अशी मागणी ग्रामसुधारक मंडळ न्हावे माजी अध्यक्ष योगेश कुंडलिक पाटील यांनी केली आहे.

योगेश पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षभरापासून गावातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून नागरिकांना पाणी साठवून ठेवण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. अनेक कुटुंबांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत



असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांचे हाल होत आहेत.

गावातील मुख्य जलवाहिनीवरून काही व्यक्तींनी अनधिकृत जोडण्या घेऊन पाणीचोरी सुरू ठेवल्याचा आरोपही करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी बेकायदेशीर जोडण्या तोडण्यात आल्या होत्या. मात्र त्या पुन्हा सुरू झाल्याचे दिसून येत असल्याने पाणीचोरी करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. या प्रकारामुळे अधिकृत ग्राहकांना मिळणाऱ्या पाण्याच्या प्रमाणात मोठी घट होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

योगेश कुंडलिक पाटील यांनी सांगितले की, गावातील पाणीप्रश्न सोडवण्यासाठी सिडको प्रशासन, संबंधित शासकीय विभाग आणि लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष घालण्याची गरज आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही होताना दिसत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

सध्याची परिस्थिती पाहता गावात तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा, अशी मागणी करण्यात येत आहे. तसेच पाणीचोरी रोखण्यासाठी विशेष मोहीम राबवून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अशीही मागणी पुढे आली आहे.

पाणीपुरवठा अनियमित असल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात पाणी साठवून ठेवावे लागत आहे. त्यामुळे पाणी दूषित होण्याचा धोका वाढला असून संसर्गजन्य आजार पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ पाणीपुरवठ्यापुरता मर्यादित नसून सार्वजनिक आरोग्याशी संबंधित गंभीर विषय बनला आहे.

"न्हावे गावातील नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. प्रशासनाने तातडीने पाणीचोरी रोखून टँकरची व्यवस्था करावी व दीर्घकालीन उपाययोजना जाहीर कराव्यात. अन्यथा ग्रामस्थांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल," असा इशारा ग्रामसुधारक मंडळ न्हावे माजी अध्यक्ष योगेश कुंडलिक पाटील यांनी दिला आहे.

# सिंदखेडराजा ते रायगड सुरडकर स्वराज सायकल यात्रा, वाटेत केले बीजारोपण






**छत्तपती संभाजीनगर :** वसुंधरा एडवेंचर फाउंडेशन व रेनील फाउंडेशन, जालनातर्फे राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या पुण्यतिथी निमित्त वसुंधरासाठी बीज रोपणासाठी गिर्यारोहक विनोद हरिभाऊ सुरडकर यांनी स्वराज्य सायकल यात्रेस सुरवात केली आहे.नवनियुक्त अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या हस्ते मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे गुरुवारी या मोहिमेस सुरवात करण्यात आली.जालना, छत्रपती, संभाजीनगर, अहिल्यानगर, पुणे मुळशी मार्गे 500 किमीचा प्रवास करत हे सायकलस्वार छत्रपती शिवाजीमहाराज यांचे समाधीस्थळ येथे रायगड येथे 17 जूनला पोहचणार आहेत. तसेच प्रवासात वसुंधरेच्या रक्षणासाठी बीज रोपण करत आहेत. यात सावली देणार्या विविध वृक्षांची बियाणे 3 हजार मातीचे गोळे (सिड्स बॉल) करून रस्त्याच्या आणि उघड्या माळराना वरती टाकण्यात येत आहेत.

मातृतीर्थ सिंदखेडराजा राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब यांचे जन्मस्थळ राजवाडा येथे जिजामाता यांचे वंशज शिवाजी दत्तात्रय राजेजाधव यांच्या हस्ते सायकलचे पूजन करून या सायकलपटूंना शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी प्रदीप खरात , सुखदेव भापकर , सपना सुरडकर,विलास विघ्ने आदी उपस्थित होते.




मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911